जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२४/१०/२०२३
## दि.२३/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ३२६/२०२३,भादविक ३०७,१४३,१४४,१४७,१४८,१४९,५०४,५०६,आर्म ॲक्ट कलम ४(२५),म.पो.कायदा कलम ३७(१),१३५,क्रि.लॉ.अमेडमेंट ॲक्ट कलम ७ |
| **फिर्यादी** | ऋषिकेश ऊर्फ चेतन पवार,वय २३ वर्षे,रा.गल्ली नं.५९,जनता वसाहत,पुणे |
| **आरोपीत** | १.मिलींद सुधीर कवडे,वय-१९ वर्षे,रा.गल्ली नं.३८,जनता वसाहत,पुणे २.शुभम नारायण मोरे, वय-१९ वर्षे,रा.सदर ३.संकेत श्रीकांत घाणेकर,वय-१९ वर्षे,रा.गल्ली नं.३९,जनता वसाहत,पुणे (अटक) व इतर दोन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/१०/२०२३ रोजी ००/१५ वा.फिर्यादी यांचे राहते घरा जवळील वाघजाई मित्र मंडळा जवळ,गल्ली नं.५९ जनता वसाहत,पुणे येथे सार्वजनिक ठिकाणी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घराजवळ वाघजाई मित्र मंडळाचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या होम मिनीस्टर कार्यक्रम संपल्यानंतर तेथील खुर्च्यांची आवरा-आवर करीत असताना, यातील नमुद इसमांनी त्यांचे हातामध्ये धारधार हत्यारे घेवुन येवुन,विनाकारण फिर्यादीस जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचे डोक्यात धारधार हत्याराने मारले,त्यावेळी तो वार त्यांचे डावे हाताचे वार बसुन,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच फिर्यादी व त्यांचे मित्रांना शिवीगाळ करुन,तेथील नागरीकांना शिवीगाळ करून,मंडळातील सर्वांना मारुन टाकणार आहे अशी धमकी देवुन जात असताना,फिर्यादी यांचे घराजवळ राहणाऱ्या महिला हिचे डोक्यात धारधार हत्याराने मारुन तीस जखमी करुन,सदर परिसरा मध्ये दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. चंद्रकांत कामठे ९९२२९७०९७२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ३१२/२०२३,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ५९ वर्षे,रा.राम नगर,बोफखेल,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/१०/२०२३ रोजी सकाळी ११/१५ वा. फिर्यादी यांचे दुकानावर मस्के वस्ती,आळंदी रोड, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे दुकानावर हजर असतांना,यातील नमुद अनोळखी इसम हा फिर्यादी यांचे दुकानावर येवुन,मला १४ वर्षानंतर मुलगा झालेला आहे,म्हणुन एका ठिकाणी दान करावयाचे असल्याने ५०० रुपयेची जुनी नोट पाहीजे असा बहाणा करुन फसवणुक करण्याचे उद्देशाने फिर्यादी यांचे जवळ असलेल्या २७,५००/- रुपये नाटांचे बंडल स्वतःकडे मोजण्यास घेवुन,सदर बंडल मधील ५००/- रुपये दराच्या ४० नोटा फिर्यादी यांची दिशाभुल करुन हातचलाखीने काढुन घेवुन,फिर्यादी यांची एकुण २०,०००/- रुपयेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.एस.माळी ९८२३७१७०८० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ७५३/२०२३,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | मुंकुंद कुलथे,वय-४१ वर्षे,रा.युवराज बिल्डींग,धायरी,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/१०/२०२३ रोजी १८/३० वा.ते ७१९/२० वा.चे दरम्यान रिलायंन्स मार्ट जवळील ज्वेलर्सचे दुकानात,औंध,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रिलायंन्स मार्ट जवळ,औंध,पुणे येथील ज्वेलर्सचे दुकाना मध्ये ब्रँच मॅनेजर आहेत. फिर्यादी हे दुकाना मध्ये हजर असताना,यातील नमुद अनोळखी इसमाने सोने खरेदी करण्याच्या बहाण्याने फिर्यादी यांचे दुकानात येवुन,सोन्याची कानातील रिंग बघत असताना, फिर्यादी व इतर कामगारांची नजर चुकवुन,ट्रे मधील सोन्याचे कानातील रिंग ३२,६७०/- रुपये किंची चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, वाघवले ९९२३४१११२७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ३४४/२०२३,भादविक ३०७,४९८(अ),३२३,५०४,५०६,भारतीय हत्यार कायदा अधिनियम कलम ४(२५),म.पो.अधिनियम कलम ३७(३)(१)१३५,तसेच हुंडा प्रतिबंधक अधिनियम कलम ३ व ४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२० वर्षे,रा.लेन नं.१,सागर पार्क,वडगाव-शेरी,पुणे |
| **आरोपीत** | जखमीचे पती इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/१०/२०२३ रोजी रात्रौ २१/०० वा.ते दि.२२/१०/२०२३ रोजी ०३/३० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी लेन नं.१,सागर पार्क,वडगाव-शेरी-पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे दि.०९/०७/२०२३ रोजी यातील नमुद तीचा पती याचेशी विवाह होवुन त्याचेबरोबर वडगाव-शेरी येथे नांदत असताना,लग्नानंतर त्याने फिर्यादी यांचेशी थोडे दिवस व्यवस्थित राहुन,त्यानंतर फिर्यादी यांना तुझे आई वडिलांनी लग्नात खर्च केला नाही,तु तुझ्या माहेराकडुन ३० लाख रुपये घेवुन ये असे वारंवार सांगुन,त्यांचेकडील व्हीडीओ व्हायरल करण्याची धमकी देवून,त्यांना मानसिक व शारिरीक त्रास दिला. दिनांक २१/१०/२०२३ रोजी फिर्यादी हया त्यांची ननंद हिचे मुलाच्या वाढदिवसावरून घरी आल्या असता,तीचे पतीने फिर्यादीस तु कोठे होतीस यावरून फिर्यादीवर संशय घेवुन तीस शिवीगाळ करून,संशयाच्या कारणावरून त्याने घरात ठेवलेल्या धारधार कोयत्याने फिर्यादीस जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचे डोक्यात मारून,त्यांना गंभीर जखमी केले. त्यानंतर खलबत्यांचा दांडयाने डोक्याचे मागील बाजुस मारून बेशुध्द करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर फिर्यादी हया शुध्दीवर आल्यानंतर पुन्हा त्याच्या हातातील लोखंडी कड्याने फिर्यादी यांचे कानावर तसेच पडद्याचे लोखंडी पाईपाने डाव्या गालावर व मांडीवर मारून गंभीर जखमी केले आहे. सदर प्रकारानंतर फिर्यादी यांनी दिनांक २२/१०/२०२३ रोजी त्यांचे वडीलांना फोन करून बोलावून घेतले असता,सदर इसमाने फिर्यादी यांचे वडीलांना उद्देशुन तु माझ्यावर एफआयआर करतोस काय तुलाही बरबाद करीन असे म्हणुन त्याच्या जवळील असलेल्या धारदार हत्याराने फिर्यादी यांचे वडिलांच्या उजव्या हाताचे अंगठ्या जवळ मारून,त्यांना सुध्दा जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. घोरपडे ९४०३०४८७६७ |

## <u>दि.२४/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ८५७/२०२३,भादविक ३०८,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२२ वर्षे,रा.खराडी,पुणे |
| **आरोपीत** | चेतन वसंत पडवळ,रा.रो-हाऊस,डी-३०,ओझोन व्हिलास सोसायटी,वाघोली,लोहगाव रोड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/१०/२०२३ रोजी रात्रौ ११/१५ वा.रो-हाऊस,डी-३०,ओझोन व्हिलास सोसायटी, वाघोली,लोहगाव रोड,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वाघेश्वर चौक,अँस्टर सोसायटी वाघोली,पुणे येथे डॉमिनोज पिझ्झा या दुकानात असोसिएट मॅनेजर म्हणुन नोकरी करतात. फिर्यादी यांना रात्री १०/३० वा.नमुद इसमाने डॉमिनोज पिझ्झाचे ॲपवर झोमॅटो मार्फतीने पिझ्झाची ऑर्डर केली होती. फिर्यादी यांचे डॉमिनोज पिझ्झा मध्ये काम करणारे डिलीव्हरी बॉय राहुल घोरपडे हे सहकारी ऋषीकेश अन्नपुर्वे याचेसह पिझ्झाची ऑर्डर रात्री १०/४५ वा.चेतन पडवळ याचे ओझोन व्हिलास सोसायटी मध्ये गेले असताना,सदर इसमाने दरवाजा उघडुन,त्यांना शिवीगाळी करुन ऋषीकेश अन्नपुर्वे यास हाताने मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी हे त्यांचे डिलीव्हरी बॉय यांना मारहाण का केली याबाबत विचारणा करण्यासाठी गेले असताना,सदर इसमाने त्यांची कॉलर पकडुन, तुम्ही इथे का आला असे बोलुन,पळत जाऊन घरा बाहेरील त्यांच्या उभ्या असणा-या कार मधुन पिस्टल काढुन,ती लोड करुन,वरच्या दिशेने हवेत ०१ गोळी झाडली,त्यांच्या याकृत्यामुळे वरच्या मजल्यावरील एखाद्या इसमाला ती लागुन त्याचा मृत्यु ओढवु शकतो हे माहीत असतानाही,त्यांनी पिस्टलचे ट्रिगर ओढुन सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सुरज गोरे ९९७५०७४०६२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**